◆ बुलडाणा ◆ वर्ष - 3 ◆ अंक - १९५ ◆ पृष्ठे - ४ ◆ RNI No . MHBIL/25/A1435 ◆ batamijagata@gmail. com ◆ मुख्य संपादक : कैलास हरीभाऊ राऊत - 9561596693 ◆ मानद संपादक : गणेश निकम

दैनिक शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५

# बातमी जगत

आवाज जनसामान्यांच्या हक्काचा

**TRENDING NEWS**

अभिनेत्री हुमा कुरेशीच्या चुलत भावाची हत्या:पार्किंगच्या वादातून धारदार शस्त्राने हल्ला, दोन्ही आरोपींना

■ पान ४ वर



## थोडक्यात

### खिडकी तोडून बॅटरी लंपास

**यवतमाळ :** शहरातील लकडगंज भागातील श्रीराम टिंबर नावाच्या फर्निचर दुकानात अज्ञात चोरट्याने खिडकी तोडून आत प्रवेश करत दहा हजार रुपये किमतीची बॅटरी लंपास केली. ही घटना ४ ऑगस्टच्या रात्री ते ५ ऑगस्टच्या सकाळच्या दरम्यान घडली. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. राम प्रशांत मानेकर (वय २८) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, चोरट्याने त्यांच्या दुकानाच्या ऑफिसची खिडकी तोडली. त्यानंतर त्याने ऑफिसमध्ये ठेवलेली 'वुई पॉवर' कंपनीची लाल रंगाची दुचाकीची बॅटरी चोरून नेली. या चोरीमुळे परिसरातील दुकानदारांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून, पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अज्ञात चोरट्याचा शोध सुरू केला आहे.

### कोयत्याने सपासप वार करून खून

**यवतमाळ :** दोन महिन्यांपूर्वी झालेल्या वादाचा राग मनात धरून दोन तरुणांनी एका ३२ वर्षीय तरुणावर तलवार आणि कोयत्याने सपासप वार करून त्याची निर्घृण हत्या केली. ही थरारक घटना तालुक्यातील वाघाडी जांब येथे सोमवारी (दि. ४) रात्री घडली. याप्रकरणी यवतमाळ ग्रामीण पोलिसांनी दोघांना अटक केली आहे. सिताबाई मलखान बोरकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मृतक महेश नरेश कोल्हेकर याने दोन महिन्यांपूर्वी आरोपी उमेश सुखदेव शिरभाते याच्या आजीला दारूच्या नशेत मारहाण केली होती. याचाच राग मनात धरून आरोपी उमेश आणि रोषण उत्तम राउत यांनी संगनमत करून महेश याला ठार मारले. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे.

### महिलेवर कुऱ्हाडीने हल्ला

**दिग्रस :** तालुक्यातील विठाळा येथे जमिनीच्या जुन्या वादातून तीन जणांनी संगनमत करून एका महिलेवर कुऱ्हाडीने हल्ला करून तिला गंभीर जखमी केले. ही घटना मंगळवारी (दि. ५) सकाळी घडली. याप्रकरणी दिग्रस पोलिसांनी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सयाबाई दादाराव बिडवाल (वय ३५) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी नितेश आनंदराव बिडवाल, अभिषेक आनंदराव बिडवाल आणि सरस्वती आनंदराव बिडवाल यांनी जुन्या जागेच्या वादावरून त्यांच्यासोबत वाद घातला. आरोपींनी त्यांना शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच, थापडाबुक्क्यांनी मारहाण करत नितेश याने कुऱ्हाडीने त्यांच्या डोक्यावर मारून जखमी केले. पोलिसांनी गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

## गडचिरोली: दादा भुसेंनी पाठ फिरवताच शिंदेसेनेच्या दोन गटात राडा

# श्रेयवादावरून दोन जिल्हाप्रमुख भिडले

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**गडचिरोली :** राज्याचे शालेय शिक्षण मंत्री व शिंदेसेनेचे नेते गुरुवारी गडचिरोली दौऱ्यावर आले होते. पक्षाच्या बैठकीनंतर ते माघारी फिरताच दोन जिल्हाप्रमुख व त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाल्याने विश्रामगृहात काही काळ तणाव निर्माण झाला होता. यावेळी उपस्थितांनी मध्यस्थी करून वाद सोडवला. नव्या कार्यकारीणीच्या घोषणेनंतर शिंदेसेनेत वादाची ठिणगी पडली होती. हे विशेष.



राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे ७ ऑगस्टरोजी पाहिल्यांदाच गडचिरोली दौऱ्यावर आले होते. सकाळी झालेल्या दुर्दैवी अपघातानंतर त्यांनी आपला दौरा आटोपता घेतला. मात्र, पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसोबत बैठक आटोपल्यानंतर ते चंद्रपूरला रवाना होताच शिंदेसेनेतील दोन जिल्हाप्रमुखांमध्ये श्रेय वादावरून तुफान राडा झाला आणि ते एकमेकांवर भिडल्याचा प्रकार विश्रामगृहात बघायला मिळाला.

शिवसेना गडचिरोली जिल्हाप्रमुख म्हणून संदीप ठाकूर तर अहेरी जिल्हाप्रमुख म्हणून राकेश बेलसरे सध्या कार्यरत आहेत. शिक्षण मंत्री दादा भुसे यांची विश्रामगृहात पदाधिकाऱ्यांसोबत बैठक होती. त्यामुळे जिल्हाभरातील शिवसेना पदाधिकारी येथे उपस्थित होते. मात्र, मंत्री भुसे चंद्रपूरकडे रवाना होताच दोन पदाधिकाऱ्यांमध्ये श्रेय वादावरून हमरीतुमरी झाली. यावेळी दोघांचे कार्यकर्तेही एकमेकांवर भिडले. त्यामुळे शिंदे सेनेतील अंतर्गत वाद आता चव्हाट्यावर आला आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी हा वाद झाल्याने पक्षाला याचा फटका बसू

### ग्रामस्थांनी शिक्षणमंत्र्यांचा ताफा अडवला

■ गडचिरोली-नागपूर मार्गावरील काटली गावात गुरुवारी सकाळी सपाच वाजताच्या सुमारास एका भरधाव ट्रकनने सहा मुलांना चिरडले. त्यात चार जणांचा मृत्यू झाला. दोघांना हेलिकॉप्टरच्या सहाय्याने नागपूरला उपचारासाठी हलवण्यात आले असून या घटनेनंतर काटली गाववासियांनी तब्बल पाच तास नागपूर मार्गावरील वाहतूक रोखून धरली. दरम्यान, गडचिरोलीच्या दौऱ्यावर असलेले शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देऊन गावकऱ्यांची समजूत काढली. त्यामुळे 5 तासानंतर येथील वाहतूक सुरू झाली आहे. त्यामुळे, या मार्गावरुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांचा जीव भांड्यात पडला. मात्र, अपघातात चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळव्यक्त होत आहे..

### सहाय्यक आयुक्तांना दिल्या कोंबड्या भेट



**नागपूर : सहकार नगर भागात अवैधपणे सुरू असलेल्या मटण मार्केट विरोधात या भागातील संतप्त नागरिकांसोबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने या संदर्भात अनोखे आंदोलन केले. लक्ष्मी नगर झोनच्या सहाय्यक आयुक्तांना चक्क कोंबड्या भेट दिल्या. या पद्धतीने मार्केटला विरोध करण्यात आला. मटन मार्केटला महापालिकेच्या अधिकाऱ्यांचा सरळ सरळ पाठिंबा असल्याचा आरोप मनसेकडून करण्यात आला. अनेकदा निवेदने देण्यात आली. मात्र, कारवाई केली जात नाही, असाही आरोप करण्यात आला. सहाय्यक आयुक्त चौधरी यांना मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी कोंबड्या भेट दिल्या.**

# पिस्तूल रोखून किराणा व्यावसायिकाच्या घरावर जबरी चोरीचा प्रयत्न

**बातमी जगत | प्रतिनिधी**

वणी : केळापूर तालुक्यातील पाटणबोरी येथील एका किराणा व्यावसायिकाच्या घरात शिरून पिस्तूल रोखत जबरी चोरीचा प्रयत्न झाल्याच्या घटनेने प्रचंड खळबळ उडाली असून पाटणबोरीत या घटनेने भितीचे वातावरण पसरले आहे. बुधवारी रात्री ९.२० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी अज्ञात लुटारू विरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पाटणबोरीतील किराणा व्यावसायिक वासुदेव उपलेंचवार हे त्यांच्या पत्नीसह वार्ड क्रमांक चारमध्ये वास्तव्याला आहेत. ६ ऑगस्टला रात्री ९.२० वाजताच्या सुमारास जेवण केल्यानंतर वासुदेव उपलेंचवार घरातील व्हॉलमध्ये टिव्ही पाहत बसून होते. यावेळी दाराला आतून कडी लावलेली नव्हती. याचवेळी एक लाल टी-शर्ट परिधान केलेला व चेहऱ्यावर पांढरा रूमाल बांधलेला अज्ञात लुटारू वासुदेव उपलेंचवार यांच्या घराच्या आवारात शिरला. त्यानंतर त्याने दरवाजा ढकलून हॉलमध्ये प्रवेश केला. वासुदेव उपलेंचवार यांनी त्याला कोण आहे? कशाला आला? याबाबत विचारणा केली असता, त्याने पिस्तूल काढून उपलेंचवार यांच्यावर ताणली. बंदूक ताणताच वासुदेव उपलेंचवार यांना काही सुचले नाही. त्यांनी थेट त्याला दरवाजातून धक्का देऊन बाहेर पोर्चवर पाडले आणि दरवाजा आतून कुंडी लावून घेतला. त्यानंतर दरवाजाच्या बाजुला असलेल्या काचेमधून चोर कुणीकडे गेला, याची पाहणी केली. मात्र तो नंतर दिसला नाही. त्यांनी शेजाऱ्यांना या घटनेची माहिती दिल्यानंतर डॉ. प्रवीण उपलेंचवार व सोनू पवार व अन्य काही नागरिक उपलेंचवार यांच्या घरी पोहोचले. मात्र त्या ठिकाणी चोर दिसला नाही.


■ **मजुरावर आली शंका**

घराच्या मागील बाजुला मोनू पवार यांच्या घराच्या बांधकामावर मजूर राहतात. हे सर्व मजूर उत्तर प्रदेशातील आहेत. तेथे जाऊन बघितले असता, एक युवक लाल टी शर्ट घातलेला दिसून आला. त्या युवकाच्या दोन्ही पायांना जखमा झाल्या होत्या. त्याला विचारपूस केली असता, त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. या घटनेची माहिती रात्रीच पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी संशयित आरोपीला विचारपूस केली. रात्री १ वाजता वासुदेव उपलेंचवार यांनी याप्रकरणी पांढरकवडा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. या घटनेचा तपास एपीआय पेंढारकर हे करीत आहेत. पाटणबोरी येथे रात्री दोन पोलिसांची ड्युटी लावण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. पाटणबोरी येथे पोलीस आऊट पोस्टला रात्री कोणीही राहत नसल्याने पाटणबोरीत गुन्हे वाढू लागले आहेत.

# पतीने केला पत्नीचा चाकूने खून

**बातमी जगत | प्रतिनिधी**

यवतमाळ : पतीसोबत वाद झाल्यानंतर भावाकडे आलेल्या विवाहितेचा पतीने गुरुवारी दुपारी चाकूने भोसकून खून केला. या घटनेची माहिती डायल ११२ वरून पोलिसांना मिळाली. लोहारा पोलिस घटनास्थळी पोहोचले तेव्हा विवाहिता जागेवरच गतप्राण झाली होती. ही थरारक घटना चौसाळा मार्गावरील साईदृष्टी अपार्टमेंट (बोदड) येथील पार्किंगमध्ये घडली.



देवयानी चंद्रशेखर ठक (२७) रा. शुभम मंगल कार्यालयाजवळ भोसा असे मृत महिलेचे नाव आहे. ती पतीसोबत वाद झाल्यामुळे चौसाळा मार्गावरील साईदृष्टी अपार्टमेंटमध्ये भावाकडे आली होती. तिला दोन वर्षांचा मुलगा आहे. पत्नीवर संतापलेला चंद्रशेखर गुरुवारी दुपारी चौसाळा रोडवर पोहोचला. तेथे अपार्टमेंटच्या पार्किंगमध्ये देवयानीसोबत पुन्हा वाद घातला. या वादातच चंद्रशेखरने धारदार चाकूने तिच्यावर सपासप वार केले. हे दृश्य पाहणाऱ्या व्यक्तीने पोलिसांना डायल ११२ वरून घटनेची माहिती दिली. लोहारा पोलिस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. मात्र, तोपर्यंत देवयानी जागेवरच गतप्राण झाली होती.

आरोपी चंद्रशेखर तेथून पसार झाला. घटनास्थळी पोलिस उपनिरीक्षक गजानन अजमिरे व त्यांच्या पथकाने भेट दिली. ही घटना दुपारी २:४५ वाजता घडल्याचे सांगण्यात येत आहे. देवयानीचा भाऊ ॲड. अश्विन ठाकरे हे कामानिमित्त घराबाहेर गेले होते. देवयानी घरी एकटी असतानाच हा प्रकार घडल्याचेही सांगण्यात आले. घटनास्थळावर फॉरेन्सिक व्हॅनही दाखल झाली आहे. त्यांच्याकडून तेथील भौतिक व रासायनिक नमुने गोळा केले जात आहे.

### आरोपी अटकेत

या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. दिव्यानीच्या नातेवाईकांनी तिच्यावर अन्याय झाल्याचे सांगत आरोपीस कठोर शिक्षा व्हावी, अशी मागणी केली आहे. पोलिसांनी चंद्रशेखर ठक याच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदवून
अटक केली असून पुढील तपास लोहारा पोलीस करीत आहे.

# वृद्धांना मारहाण करून जबरी चोरी करणारी टोळी जेरबंद

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**औंढा नागनाथ :** हिंगोली जिल्ह्यातील आखाड्यांवर वृद्धांना मारहाण करून जबरी चोरी करणारी टोळी अखेर पोलिसांच्या जाळ्यात सापडली आहे. औंढा परिसरातील दोन गंभीर गुन्ह्यांचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने चार आरोपींना अटक केली. त्यांच्याकडून तब्बल २ लाख ५६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

उध्दव मारोती बोरकर (वय २१, राहूली खुर्द, हिंगोली), सचिन मदन गिरी (वय २२, राहूली खुर्द, हिंगोली), यश गणेश काळे (वय १९, पारधीवाडा, हिंगोली), शेख खलील शेख रियाजोददीन (वय २१, बावनखोली, हिंगोली) अशी आरोपींची नावे आहेत.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गेल्या काही दिवसांत शेतातील आखाड्यांवर राहणाऱ्या वृद्धांना मारहाण करून त्यांच्या अंगावरील सोन्या-चांदीचे दागिने जबरदस्तीने काढून नेण्याचे प्रकार घडले होते. या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या गुन्ह्यांचा तातडीने तपास करण्याचे आदेश जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी दिले होते.

स्थानीय गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मोहन भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विक्रम विठुबोने, पोलीस उपनिरीक्षक माधव जिव्हारे आणि त्यांच्या पथकाने सखोल तपास केला. गुप्त माहिती आणि तांत्रिक साधनांचा वापर करून आरोपींना अटक करण्यात आली: या आरोपींकडून चोरीस गेलेले सोन्या-चांदीचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल आणि मोबाईल असा एकूण २,५६,००० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. औंढा पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या दोन गुन्ह्यांचा उलगडा या कारवाईमुळे झाला आहे.

# महादेवी हत्तीणीला परत आणण्यासाठी वाशीममध्ये मुक मोर्चा

**▸ वाशीम,**

कोल्हापुर वासीयांना लळा लागलेल्या व भावना जुळलेल्या महादेवी हत्तीण कोल्हापूरला परत आणा, या मागणीसाठी वाशीम येथे ७ ऑगस्ट रोजी जीवदया प्रेमी संघटनेच्या वतीने मूक मोर्चा काढण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देवून आपल्या भावना व्यक्त केल्या.

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुयातील नांदणी गावातील महादेवी नावाच्या हत्तीणीला वनतारा येथे पाठवण्यात आले आहे. महादेवी हत्तीणीला परत आणण्याची मागणी सर्वस्तरातून होत आहे. सदर मोर्चाची सुरूवात बालाजी मंदिराजवळून करण्यात आली. सदर मुक मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक, पाटणी चौक, अकोला नाकामार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला. यावेळी मोर्चेकरांनी आपल्या भावनांचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देवून महादेवी हत्तीण वनतारा येथून आपल्या कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठात मुळ ठिकाणी आणण्याची मागणी करण्यात आली. महादेवी हत्तीण गेल्या ३५ वर्षापासून कोल्हापूर जिल्ह्यातील नांदणी मठात आपले वास्तव्यास आहे.



मात्र, विद्यमान न्यायालयाच्या निर्देशानुसार महादेवी हत्तीणीचे स्थलांतर करण्यात आले. त्यामुळे हत्तीणीशी कोल्हापूर वासीय तसेच महाराष्ट्रातील लोकांच्या भावना दुखावल्या आहेत. महादेवी हत्तीण कोल्हापूरला परत आणावी यासाठी वाशीममध्ये जीवदया मित्रमंडळाच्या वतीने मुकमोर्चा काढून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. यावेळी तात्या भैय्या नेजकर, श्रीणीक भुरे, आनंद गडेकर,आशिष डहाले, प्रमोद मानेकर, उज्वल देशमुख, सुरेश मापारी, राजु किडसे, जुगलकिशोर कोठारी, रमेशचंद्र बज, राजेश कान्हेड, डॉ राजेंद्र वाल्ले, विनोद गडेकर, अतुल हरसुले, ए. जी. वाल्ले, राम पंचभाई, संजय काळे, नामदेव हजारे, आशिष इंगोले, निखील गोरे, धिरज बांडे, हेंमत रोकडे, प्रशांत आहाळे, आकाश आहाळे, राजेश डहाळे, संगिता इंगोले, विनया वाल्ले, वंदना तपसी, स्वाती बांडे, पुजा बज, सिमा बज, गुणमाला पाटणी, चंदा पाटणी, सध्या मानेकर, भाग्यश्री नांदगांवकर, रेखा रवने, रोहिनी कलमकर, रजनी जोगीजी, पुष्पा रोकडे, प्रविणा महाजन, छाया पवार, वर्षा घंटे, तृप्ती जोगी, पुनम सराफ, कविता खराट यांच्यासह जीवदया प्रेमी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# दगड, विटांनी ठेचून गुंडाची हत्या

**▸ नागपूर,**

वर्चस्व आणि पैशांच्या देवाण-घेवाणीवरून झालेल्या वादात एका गुंडाची दगड, विटांनी ठेचून हत्या करण्यात आली. बेसबॉलच्या स्टिकने त्याचे डोके फोडले. रक्तबंबाळ अवस्थेत तो तासभर पडून होता.

मॉर्निंग वॉकसाठी निघालेल्या लोकांची गर्दी झाली. माहिती मिळताच यशोधरानगर ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश खुणे पथकासह घटनास्थळी पोहोचले. जखमीला मेयो रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. समीर ऊर्फ येडा समशेर खान (30) रा. राजीव गांधीनगर, असे मृतकाचे नाव आहे. ही घटना गुरुवारी सकाळी 5 ते 5.30 वाजताच्या सुमारास राजीव गांधीनगरात घडली. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून आरोपींचा शोध सुरू केला आहे. या घटनेमुळे परिसरात प्रचंड खळबळ उडाली आहे.

■ **- बेस बॉलच्या स्टिकने केले रक्तबंबाळ,मृतक अमली पदार्थ विक्रीत होता सक्रिय**

मृतक समीर विवाहित असून, त्याला एक मुलगी आहे. तो अमली पदार्थ विक्रीत सक्रिय होता. गैरमार्गाने त्याने चांगली रक्कम मिळविली होती. त्याच बळावर तो दादागिरी करायचा. मुख्य आरोपी अस्सू हा रेशन धान्याचा काळा बाजार करतो. दोघेही गैरमार्गाने पैसे कमावीत असल्याने त्यांची मैत्री होती. दोघांचीही आर्थिक स्थिती भक्कम असल्याने ते पंटर ठेवत होते. त्यांची टोळी होती. दोघांचीही चलती असल्याने परिसरातील लोक त्यांना घाबरायचे. मृतक आणि मुख्य आरोपी अस्सू यांच्यात अलीकडेच पैशांची देवाण-घेवाण झाली होती. यावरून दोन दिवसांपूर्वीच अस्सूने समीरशी वाद घातला होता. तेव्हापासूनच त्या दोघांमध्ये वाद सुरू होता.आरोपी अस्सू हा समीरच्या मागावरच होता. गुरुवार, 7 ऑगस्ट रोजी सकाळी 5 ते 5.30 वाजताच्या सुमारास समीर हा घरापासून हाकेच्या अंतरावर होता. त्याच्या पाळतीवर असलेल्या अस्सूने सोबत राहणाऱ्या पंटरला बोलावून घेतले. काही कळण्यापूर्वी सहाही लोक समीरवर तुटून पडले. बेसबॉलच्या स्टिकने त्याला रक्तबंबाळ केले. तो खाली पडल्यावर विटा आणि दगडाने त्याला ठेचले. रक्तबंबाळ आणि निपचित अवस्थेत सोडून आरोपी पळून गेले. घटनास्थळी न्याय वैद्यक मोबाईल व्हॅनचे पथक पोहोचले. घटनास्थळवरून नमूने गोळा केले. वपोनि खुणे यांनी आरोपींच्या शोधासाठी विविध पथके तयार केली असून, लवकरच त्यांच्या मुसक्या आवळल्या जातील.

### लोकांनी पाहिले खिडकीतून

सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार समीरला दगड, विटांनी ठेचत असताना काही लोकांनी घराच्या आतमधूनच (खिडकीतून) पाहिले. बाहेर निघण्याची कोणाचीच हिंमत नव्हती. आरोपी पळून गेल्यानंतरही नागरिक घराबाहेर पडले नाहीत. जवळपास तास ते दीड तास समीर घटनास्थळी पडून होता. लोक मॉर्निंग वॉकसाठी निघाले असता समीर निपचित पडलेला दिसला. जवळपासच्या लोकांची प्रचंड गर्दी झाली होती.

## घटना -घडामोडी



### 10 ऑगस्ट रोजी शुभारंभ; नागपुर-पुणे वंदे भारत रेल्वेला शेगावला मिळाला थांबा...!

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** नागपुर-पुणे वंदे भारत एक्स्प्रेसला संत नगरी शेगांव मध्ये थांबा मिळवुन देण्याचे काम केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले आहे. यासंदर्भातील परिपत्रक रेल्वे विभागाच्या वतीने आज 7 ऑगस्ट रोजी काढण्यात आले आहे. 10 ऑगस्ट ला वंदे भारत ट्रेन चे उदघाटन होणार असुन या वंदे भारत ट्रेनमुळे नागपुर आणि पुणे येथुन येणाऱ्या संत गजानन महाराजांच्या भक्तांना विशेष प्रवास सुविधा मिळणार आहे. वंदे भारत रेल्वे सुरु करण्यासंदर्भात व शेगांव ला थांबा मिळण्यासाठी नुकतीच केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेतली होती त्यानंतर हे परिपत्रक निर्गमित झाले आहे. देशांतर्गत रेल सेवेला गतीमान करण्याच्या दृष्टीकोनातुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वंदे भारत रेल सेवा सुरु केली आहे. अत्यंत जलद आणि लोकांना आधुनिक सुख सुविधा देणारी भारतीय बनावटीची वंदे भारत रेल्वे भारतीयांच आकर्षण ठरली आहे. नागपुर ते पुणे हे दोन महानगर वंदे भारत रेल्वे मार्गाने जोडण्याचे काम केंद्र सरकारच्या रेल्वे विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. ही गाडी सुरु होत असतांना पहिल्या परिपत्रकामध्ये अजनी, नागपुर, वर्धा, बडनेरा, अकोला, भुसावळ, जळगांव, मनमाड, कोपरगांव, अहिल्यानगर, दौंड मार्गे पुणे असा वंदे भारत रेल्वे चा प्रवास थांबा मंजुर करण्यात आले होते. विदर्भाची पंढरी म्हणुन ओळख असलेल्या बुलढाणा जिल्हयातील संतनगरी शेगांव येथील दररोज देशभरातुन भाविक येत असतात. नव्याने सुरु होत असलेल्या वंदे भारत या रेल्वेला शेगांव येथे थांबा मिळावा यासाठी केंद्रिय आयुष आरोग्य व कुटूंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्हयाचे खासदार प्रतापराव जाधव यांनी केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांची भेट घेवुन मागणी केली होती. शेगांव संस्थान विषयी रेल्वे मंत्र्यांना माहिती देऊन हा थांबा भाविकांसाठी महत्वाचे असल्याचे त्यांना पटविन दिले होते.
त्या नंतर रेल्वे विभागाच्या वतीने शेगांव रेल्वे स्थानकाला थांबा देण्यासंदर्भातील परिपत्रक 7 ऑगस्ट ला रेल्वे बोर्डाचे निदेशक संजय निलम यांच्या स्वाक्षरीने निर्गमीत झाला आहे. नागपुर-पुणे वंदे भारत एक्सप्रेसचा शुभारंभ 10 ऑगस्ट ला होणार आहे. हि गाडी आठवडयातुन 6 दिवस चालणार असुन नागपुर येथुन सकाळी 09.50 ला सुटनार असुन वर्धा, बडनेरा, अकोला, मार्गे दुपारी 01.20 च्या दरम्यान शेगांव येथे ही वंदे भारत रेल्वे थांबणार आहे. तर परतीच्या प्रवासात पुण्यावरुन येतांना दुपारी 02.45 वा. शेगांव येथे ही रेल्वे थांबणार आहे. नागपुर-पुणे हे 884 कि.मी. चे अंतर ही वंदे भारत रेल्वे अवघ्या 10 तासात पुर्ण करणार आहे. सकाळी 09.50 ला नागपुर येथुन सुटणारी ही वंदे भारत ट्रेन प्रवाशांना त्याच दिवशी रात्री 09.50 ला पुणे येथे सोडणार आहे. बुलढाणा लोकसभा मतदार संघातील शेगांवचे संत गजानन महाराज संस्थान संपुर्ण देशामध्ये प्रसिध्द आहे. देशभरातुन लाखो भाविक संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी शेगांव नगरीमध्ये येत असतात. पुणे आणि नागपुर हे दोन्ही महानगर हवाई सेवेशी जोडलेले आहे. या महानगरातुन देश-विदेशातुन येणाऱ्या संत गजानन महाराजांच्या भक्तांना प्रवासाची सुविधा उपलब्ध करुन देणारी हि वंदे भारत रेल्वे ठरणार आहे. भाविकांच्या आणि मतदार संघातील नागरीकांच्या सुविधेसाठी केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी वंदे भारत ट्रेनला शेगांव येथे थांबा मिळवुन दिल्याने तिचा लाभ भक्तांसोबत जिल्हयातील नागरीकांनाही होणार आहे. केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केलेली मागणी केंद्रिय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांनी मान्य करुन या संदर्भातील परिपत्रक निर्गमित केल्याने केंद्रिय मंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हावासीयांच्या वतीने केंद्रिय रेल्वे मंत्र्यांचे आभार मानले आहेत.

### शिवसेनेच्या मंत्र्यांना इनकम टॅक्सची नोटीस

**बातमी जगत | प्रतिनिधी**

एकनाथ शिंदेंच्या सर्व मंत्र्यांना आयकर विभागाची नोटीस गेली असल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी केला आहे. एकनाथ शिंदेंच्या कुटुंबातील एका सदस्याला देखील ईडीची नोटीस गेलेली असल्याचेही त्यांनी सांगितले. ते आज छत्रपती संभाजीनगर येथे माध्यमांशी बोलत होते. यावेळी त्यांनी राज्यात सुरू असलेल्या पक्षप्रवेशांवरही संभावना व्यक्त केल्या. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत आज छत्रपती संभाजीनगरमध्ये पक्षाचा कार्यकर्ता मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यानंतर रोहित पवार यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी माध्यमांशी बोलताना अनेक दावे केले. महायुतीमध्ये सध्या सर्व काही ऑल इज नॉट वेल सुरू आहे. एकनाथ शिंदेंच्या सर्व मंत्र्यांना इनकम टॅक्सच्या नोटीस गेलेल्या आहेत. स्वत: एकनाथ शिंदेंच्या परिवारातील एका व्यक्तीला सुद्धा ईडीची नोटीस गेलेली आहे. कदाचित संजय शिरसाट यांचा व्हिडिओ बघितल्यानंतर एकाकडेच एवढ्या बॅग असतील, तर बाकींच्याकडे सुद्धा असू शकतात, असे आयकर विभागाला वाटले असेल. त्यामुळे त्यांना नोटीस गेल्या असाव्यात, असे रोहित पवार म्हणाले. नोटीस आली नसेल,

# खामगावं औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील प्रशिक्षणार्थ्यांची विविध पदावर निवड

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** सतगुरू श्री अगाशे काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, खामगांव येथील शिल्प कारागिर प्रशिक्षण योजनेअंतर्गत सन २०१७ ते २०२२ या कालावधीत विविध व्यवसायात प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींनी आपली यशस्वी वाटचाल करत शासकीय व खाजगी क्षेत्रात विविध पदांवर निवड मिळवली आहे. विशेषतः विजतंत्री व तारतंत्री व्यवसायातील २०२०, २०२१ व २०२२ साली प्रवेशित प्रशिक्षणार्थी महावितरणमध्ये विद्युत सहायक या महत्त्वाच्या पदावर कार्यरत झाले आहेत. या यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांमध्ये पवन जामोदे, गौरव चव्हाण, शिवराज हागे, विकास ठाकरे, मयुर गव्हाळे, संदेश गोळे, शितल पारसकर, संजना वानखेडे, ज्योत्सना भोजने, गजानन वाघमारे, आशिश तेलगोटे, आकाश पातोंड, कु. शितल राठोड, पंकज वाकोडे, कु. चंचल तायडे, कु. साक्षी सुरवाडे, कु. स्नेहा तेलगोटे, कु. वैशाली आखरे व कु. रोशनी खरले यांचा समावेश आहे. तसेच, फाउंड्रिमॅन व्यवसायात २०१८ व २०१९ मध्ये प्रवेश घेतलेल्या प्रशिक्षणार्थी अभय शिवदास राउत, शुभम एकनाथ बोरडे व सुमेध सुरेश बोदडे यांची रेल्वे टेक्निशियन आणि ऑर्डनन्स फॅक्टरीमध्ये टेक्निशियन पदांवर नियुक्ती झाली आहे, ही बाब संस्थेसाठी अत्यंत गौरवास्पद आहे. या सर्व यशामध्ये संस्थेचे प्राचार्य एस. डी. गंगावणे, उपप्राचार्य व्हि. व्हि. काळे, गटनिदेशक जे. व्हि. काळे, व्हि. के. सुपे, एन. एस. गावडे, व्हि. एस. भोजने,डि. जे. वानखडे, शिल्पनिदेशक ए. बि. माडीवाले, एस. जि. तायडे, एस. ए. खापर्डे व इतर सर्व शिल्पनिदेशक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेतील सर्व कर्मचारीवृंदांनी या यशस्वी प्रशिक्षणार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षणार्थ्यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त करत संस्थेच्या व मार्गदर्शक निदेशकांचे मनःपूर्वक आभार मानले.




## गरजू, पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देणार:

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून निवडणूक काळात भाजपाने कर्जमाफीचे आश्वासन दिले होते, ते पूर्ण करणार आणि गरजू व पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकारांना सांगितले.

महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले, 'योग्य शेतकऱ्यांना कर्जमाफी' देण्यावर सरकार भर देत आहे. त्यासाठी एक समिती नेमण्यात आली आहे, ती शेतकऱ्यांचे सर्वेक्षण करणार असून, त्या सर्वेक्षणानंतर गरजू आणि पात्र शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळेल. कर्जमाफी ही 'मेरिट'वर झाली पाहिजे. ज्यांना खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार केला जाईल. समाजातील सर्वात शेवटच्या घटकाला मदत करणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे. समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल. गुंठेवारीमध्ये अडकलेल्या घरमालकांना दिलासा देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचे सांगत बावनकुळे म्हणाले, तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींची नोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिले जात आहे. संभाजीनगर आयुक्तांना २०११ पूर्वीच्या गुंठेवारीतील बांधकामांची यादी तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## राष्ट्रीय श्रमण सेनेच्यावतीने एसटी को.ऑप. बँकेचे नवनिर्वाचित संचालक बालाजी शिदे यांचा सत्कार

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**नांदेड :**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (एसटी डेपो) नांदेड आगार येथील कार्यरत वाहतुक नियंत्रक बालाजी शिंदे याची एसटी को.ऑप. बँक लि. शाखा नांदेडच्या संचालकपदी एसटी को.ऑप. बँकेचे महाराष्ट्र राज्याचे एमडी (महाव्यवस्थापक) विजय ढगे यांनी नांदेड शाखेच्या संचालकपदी त्यांची निवड केल्याबद्दल 07 ऑगस्ट गुरूवार रोजी सायंकाळी ठिक 4 वाजता एसटी मध्यवर्ती बसस्थानक प्रमुख यांच्या दालनात राष्ट्रीय श्रमण सेनेचे महाराष्ट्र राज्याचे राज्याध्यक्ष तथा कामगार नेते अॅड.विष्णू गोडबोले यांनी संचालक बालाजी शिंदे यांचा पुष्पहाराने ह्दय सत्कार करून अभिनंदन करून भावी कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.



एसटी को. ऑ. बँक नांदेड शाखेची स्थापना 1954 साली झाली असून आज 71 व्या वर्षात कार्यरत आहे. 27 हजार सभासद संख्या असलेल्या या शाखेची वार्षिक आर्थिक उलाढाल 4 हजार 500 कोटीची असून महाराष्ट्र राज्यातील 36 जिल्ह्यात एसटी को. ऑप. बँकेचे 50 शाखा कार्यरत आहेत. यावेळी राष्ट्रीय श्रमण सेनेचे राज्याध्यक्ष तथा कामगार नेते अॅड.विष्णू गोडबोले यांनी याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. ते आपल्या भाषणात म्हणाले की, नवनिर्वाचित संचालक बालाजी शिंदे यांचा एसटीच्या कष्टकरी कामगार-कर्मचाऱ्यामध्ये प्रेमळ असे नाते असून भविष्यात त्यांनी बँकेच्या आर्थिक उलाढालीमध्ये बँकेचे सभासद व ठेवीदार यांना सहकार्याची भावना ठेवून कार्य करतीलच याचबरोबर कामगारांच्या अडी-अडचणीबद्दल मी आपल्या सर्वांसोबत सदैव सकारात्मक राहिन, असे प्रतिपादन त्यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन गुणवंत एच.मिसलवाड यांनी करून आपले विचार मांडले. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून बसस्थानक प्रमुख यासीन हमीद खान, राष्ट्रीय श्रमण सेनेचे राज्याध्यक्ष अॅड.विष्णू गोडबोले, सत्कारमूर्ती तथा संचालक बालाजी शिंदे, एसटी मेकॅनिक तथा महाराष्ट्र शासन पुरस्कार प्राप्त सामाजिक कार्यकर्ते गुणवत एच.मिसलवाड, सहाय्यक वाहतुक निरीक्षक मयूर तेलंगे, लिपीक गुलाम रब्बानी, वाहक दत्तात्रय जोशी यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी रापम आगारातील कष्टकरी कामगार-कर्मचारी, बंधू-भगिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

## चिखलीत खाकी वर्दी बदनाम

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ शिवाजी वायाळ

**बुलढाणा :** चिखली तालुक्यात पोलिसांच्या खाकी वर्दीला काळीमा फासणारी एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कर्नाटकातून आलेल्या चित्रपट निर्मात्या आणि त्याच्या सहकाऱ्यांकडून जबरदस्तीने पैसे उकळल्याच्या प्रकारात पाच वाहतूक पोलिसांविरोधात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

कर्नाटकातील चल्लकेरे येथील ताज अ. रहमान (वय २३) हे अकिब अरमान, शेख इब्राहीम आणि जुबेर अहमद यांच्यासोबत कार (केए ११ ए २८६२) मधून मलकापूरजवळ शूटिंगसाठी लोकेशन पाहण्यासाठी येत होते. चिखली-बुलडाणा रस्त्यावर दोन वाहतूक पोलिसांनी त्यांचे वाहन थांबवले आणि कागदपत्रांच्या नावाखाली ३ हजार रुपयांची मागणी केली. तडजोडीनंतर त्यांनी पेटीएमद्वारे चहा विक्रेत्याच्या खात्यात १५०० रुपये भरले आणि पुढे जाण्यास परवानगी मिळाली. परंतु, काही अंतरावर पुढे तीन इतर पोलिसांनी पाठलाग करत पुन्हा वाहन अडवले. गाडीत ठेवलेल्या एअर रायफलवरून गुन्हा दाखल करण्याची धमकी देत त्यांनी २ लाख रुपये मागितले. तडजोड करत ५० हजार रुपये क्युआर कोडने भरण्याची मागणी केली. ताज रहमान यांना संशय आल्याने त्यांनी वाहन घेऊन निघण्याचा प्रयत्न केला. गाडीत बसलेल्या दोन पोलिसांनी "पैसे नको, पण आम्हाला उतरवा," असे सांगत त्यांना गाडीतून उतरवले. मात्र गाडीचा तोल सुटल्याने अपघात झाला. या प्रकारानंतर ताज रहमान यांनी चिखली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीनुसार, कॉन्स्टेबल टेकाळे (चिखली पो.स्टे.) आणि भंडारी (जिल्हा वाहतूक शाखा) यांनी चहा विक्रेत्याच्या खात्यात १५०० रुपये ऑनलाईन भरायला लावले. तर महामार्ग पोलिस मदत केंद्रातील काळुसे, आंधळे आणि किरके यांनी २ लाखांची खंडणी मागितली आणि नंतर ती ५० हजारांवर आणली. अपघातानंतरही धमक्या...
अपघातानंतरही पोलिसांनी "पैसे दिले नाहीत, म्हणून मोठी कारवाई होईल" अशी धमकी दिल्याचा आरोप आहे. इतकंच नव्हे तर घटनास्थळी आलेल्या इतर पोलिसांना देखील "पैशांबाबत काही सांगू नका" असा दबाव आणल्याचे ताज रहमान यांनी तक्रारीत नमूद केले आहे. गुन्ह्यांची नोंद...
या पाचही पोलिसांविरोधात गंभीर स्वरूपाचे कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये मृत्यू होण्याची शक्यता असलेली कृती, धमकी, जबरदस्ती आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या चुकीच्या वर्तनासंबंधीचे विशेष कलमांचा समावेश आहे. पोलिसांची अशी वर्तणूक जनतेचा विश्वास ढासळवणारी ठरत असून या प्रकरणाचा सखोल तपास होणे गरजेचे आहे.

## माहुली गडावर भरकटलेल्या दोन युवकांना रेस्कु करण्यात यश

### जीवरक्षक टीमची कौतुकास्पद कामगिरी

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ वसंत पानसरे

**ठाणे :** ठाणे जिल्ह्यातील प्रसिद्ध असणाऱ्या आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची गर्भ संस्कार भुमी समजल्या जाणाऱ्या शहापूर तालुक्यातील किल्ले माहुली गडावर गुरूवारी वाट चुकलेल्या दोन तरूणांना रेस्कु करण्यात शहापूर पोलिस व जीव रक्षक टीमला यश आले आहे.

गुरूवारी सकाळच्या सुमारास मुबंईवरुन ट्रेकिंगसाठी आलेल्या रजित झा वय 19,राहणार पवई, आणि आमिर आली,वय 20 राहणार मालाड,मुंबई हे दोघे युवक गडावर भरकटले होते याची माहिती मिळताच त्यांनी जीव रक्षक टीमशी संपर्क साधला.तात्काळ जीव रक्षक टिम त्या युवकांना रेस्कु करण्यासाठी किल्ले माहुली गडावर पोहचली मात्र किल्याचा परीसर मोठा असल्याने त्यांना रेस्कु करण्यात अनेक अडचणी येत होत्या मात्र त्यांनी सदर युवकांशी संपर्क साधत फोटो आणि लोकेशन चा वापर करत संध्याकाळच्या सुमारास युवकांना रेस्कु करण्यात यश आले. या रेस्कु टिममध्ये रघुनाथ आगिवले,गुरुनाथ आगविले,योगेश आगेवले,भूषण विशे,तन्मय निमसे,अमित तावडे, दीपक जाधव,अतुल कापटे, समीर चौधरी व शहापूर पोलिसांनी अथक प्रयत्न करुन त्या दोन युवकांना रेस्कु केल्याबद्दल त्यांचे कौतुक होत आहे.



## मदन वा.पातुरकर विद्यालयात माता-पालक शिक्षक संघाची स्थापना

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ अनिल राठोड

**डोणगांव :** शिक्षण प्रसारक मंडळ चिखली द्वारा संचालित मदन वामन पातुरकर विद्यालय व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय ,डोणगाव. येथे आज दिनांक 5 ऑगस्ट रोजी माता- पालक शिक्षक संघाची स्थापना करण्यात आली . शाळा आणि विद्यार्थी यांचा सर्वांगीण विकास व्हावा, अध्ययन -अध्यापन प्रक्रियेत उद्भवणाऱ्या समस्यांचे निराकरण व्हावे या उद्देशाने शासन नियमानुसार शिक्षक पालक संघाची स्थापना करण्यात आली आहे म वा पा विद्यालयाचे प्राचार्य रमेश जाधव यांच्या मार्गदर्शना खाली पर्यवेक्षक अरुण मुगल यांच्या अध्यक्षतेखाली , प्रमुख वक्ते म्हणून सरकटे सर तर प्रमुख अतिथी म्हणून सौ. ज्योतीताई बुरखंडे , सौ स्वातीताई आनकर,सौ बेदरकर उपस्थितीत होत्या सर्व प्रथम दिपप्रज्वलन करुन भारतमाता व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन करुन या महिला भगिनीचे विद्यालयाच्या वतीने स्वागत करण्यात आले प्रास्ताविक मनोगतातून प्राध्यापक मापारी मॅडम यांनी माता -पालक शिक्षक संघाची स्थापना करण्या मागील भूमिका विशद केली . . प्रमुख वक्ते सरकटे सर यांनी माता- पालक शिक्षक संघाचे कार्य आणि माता-पालक शिक्षक संघाची रचना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथी सौ. ज्योतीताई बुरखंडे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले. विद्यालय राबवीत असलेल्या विविध उपक्रमाविषयी समाधान व्यक्त केले. यावेळी शैक्षणिक क्षेत्राला विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने विविध विषयांवर साधक-बाधक चर्चा आणि निर्णय घेण्यात आले. विद्यालयाचे पर्यवेक्षक अरुण मुगल यांनी आपल्या मनोगतातून माता-पालक शिक्षक संघाची उपयुक्तता आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने शिक्षक आणि पालक यांची महत्त्वपूर्ण भूमिका याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. गायकवाड मॅडम यांनी केले तर आभार प्रदर्शन कुटे मॅडम यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्राध्यापिका चव्हाण मॅडम, प्राध्यापक श्री. सुर्वे सर, प्राध्यापक श्री. शेळके सर तथा सर्व शिक्षक बंधू- भगिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू -भगिनी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी विद्यालयातील सर्व वर्गातील माता-पालक प्रतिनिधी सभेला उपस्थित होते.शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.




बातमीजगत हे पत्र मालक, प्रकाशक, कैलास हरीभाऊ राऊत यांनी मुद्रक श्रीकृपा प्रिंटर्स, मुद्रण स्थळ जपान जिन जवळ, दगडी पुल, अकोला जि. अकोला 444002 (M. S. ) येथून मुद्रित करून -कार्यालय : बातमीजगत कार्यालय, देऊळगाव माळी ता. मेहकर जि. बुलडाणा (M. S. ) येथून प्रकाशित केले. संपादकः कैलास हरीभाऊ राऊत मो. 9561596693 प्रकाशित लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. अॅक्ट नुसार संपादक जबाबदार राहतीलच असे नाही. ) सर्व वाद विवाद मेहकर न्यायालयांतर्गत राहील. ) RNI No . MHBIL/25/A1435

This newspaper is printed by the owner, publisher, Kailas Haribhau Raut, printer Shrikripa Printers, printing place near Japan Jin, Dagdi Pul, Akola Dist. Akola 444002 (M. S. ) and published from -Office: News Jagat Office, Deulgaon Mali Tal. Mehkar Dist. Buldana (M. S. ). Editor: Kailas Haribhau Raut Md. 9561596693 The editor does not necessarily agree with the published articles and news. (The editor is not necessarily responsible according to the P. R. B. Act. ) All disputes will be subject to Mehkar Court. ) RNI No. MHBIL/25/A1435

## घटना -घडामोडी

### नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांना ३६८ कोटी ८६ लाख ८५ हजार मदतीच्या निधीस मान्यता

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना तत्काळ मदत करण्यास राज्य शासन प्राधान्य देत आहे. राज्यात जून २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर, अमरावती विभाग आणि सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव, छत्रपती संभाजीनगर व धुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी ३६८ कोटी ८६ लाख ८५ हजार मदतीच्या निधीस मान्यता दिली, असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले. या बाबतचे शासन निर्गमित जारी करण्यात आले आहेत. यामध्ये बुलढाणा जिल्ह्यातील ९० हजार ३८३ शेतकऱ्यांच्या ८७३९०.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७४ कोटी ४५ लाख ३ हजार रुपये निधीचा समावेश आहे. अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेतपिकांच्या मान्यता देण्यात आलेल्या निधीमध्ये छत्रपती संभाजीनगर विभागासाठी १४ कोटी ५४ लाख ६४ हजार, अमरावती विभागासाठी ८६ कोटी २३ लाख ३८ हजार आणि सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव, छत्रपती संभाजीनगर व धुळे जिल्ह्यात झालेल्या शेतपिकांच्या नुकसानीसाठी २६८ कोटी ८ लाख ८३ हजार निधीचा समावेश आहे. आपदग्रस्तांना मदतीसाठी शासन संवेदनशील आपत्ती व्यवस्थापन व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले की, नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांप्रती शासन संवेदनशील असून या बाधित शेतकऱ्यांना मदत मिळावी यासाठी बाधित पिकांचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. प्रशासनानेही बाधित अतिवृष्टी, पूर या नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकाचे तातडीने पंचनामे केल्याने बाधित शेतकऱ्यांना करण्यात येणाऱ्या निधीस मान्यता देण्यात आली. जून २०२५ मध्ये छत्रपती संभाजीनगर विभागातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील १७१ शेतकऱ्यांच्या ७२.३२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १६.०१ लाख, हिंगोली जिल्ह्यातील ३ हजार २४७ शेतकऱ्यांच्या १६११.३७ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ३६०.४५ लाख, नांदेड जिल्ह्यातील ७ हजार ४९८ शेतकऱ्यांच्या ४७९०.७८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १०७६.१९ लाख आणि बीड जिल्ह्यातील १०३ शेतकऱ्यांच्या ११ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी १.९९ लाख निधीचा समावेश आहे. अमरावती विभागातील अमरावती जिल्ह्यातील २ हजार २४० शेतकऱ्यांच्या १३१२.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २७५.७९ लाख, अकोला जिल्ह्यातील ६ हजार १३६ शेतकऱ्यांच्या ३७९०.३१ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४०५.९० लाख, यवतमाळ जिल्ह्यातील १८६ शेतकऱ्यांच्या १३०.५० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २५.४५ लाख, बुलढाणा जिल्ह्यातील ९० हजार ३८३ शेतकऱ्यांच्या ८७३९०.०२ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ७४४५.०३ लाख आणि वाशिम जिल्ह्यातील ८ हजार ५२७ शेतकऱ्यांच्या ५१६२.२८ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ४७१.२१ लाख निधीचा समावेश आहे. सप्टेंबर २०२४ ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत धाराशिव जिल्ह्यातील ३ लाख २७ हजार ९३९ शेतकऱ्यांच्या १८९६१०.७० हेक्टर बाधित क्षेत्रासाठी २६१४३.३८ लाख, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ७ हजार ५४८ शेतकऱ्यांच्या ४८९१.०५ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ६६५.४१ लाख तर धुळे जिल्ह्यातील एका शेतकऱ्यांच्या ०.३ हेक्टर बाधित क्षेत्रासाठी ०.०४ लाख निधीचा समावेश आहे. या निर्णयामुळे बाधित शेतकऱ्यास दिलासा मिळणार असून शासनाने तातडीने पंचनामे करून आर्थिक मदतीस मान्यता दिल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले असल्याचेही मदत व पुनर्वसन मंत्री श्री. जाधव-पाटील यांनी सांगितले.



### जागतिक स्कूल हॅालिबॅाल चॅम्पियनशिप; 15 वर्षाआतील मुला-मुलींकरीता निवड चाचणी

बातमी जगत | प्रतिनिधी

**बुलडाणा :** चीनमध्ये आंतरराष्ट्रीय शालेय खेल महासंघाद्वारे 15 वर्षाआतील मुलामुलींसाठी जागतिक स्कूल हॅालिबॅाल चॅम्पियनशिप होणार आहे. या स्पर्धेत भारतीय संघ सहभागी होणार असुन भारतीय संघाची निवड करण्यासाठी भारतीय शालेय खेल महासंघाने राष्ट्रीय निवड चाचणीचे आयोजन दि.25 ते 30 ऑगस्ट या कालावधीत श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगी बालेवाडी, पुणे या ठिकाणी करण्यात आले आहे. या स्पर्धेतसाठी जिल्ह्यातील उत्कृष्ठ खेळाडूंची निवड करून पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी दि.11 ऑगस्ट रोजी जिल्हा क्रीडा संकूल, बुलढाणा येथे निवड चाचणी घेण्यात येणार आहे. राष्ट्रीय निवड चाचणीत राज्याचे खेळाडु सहभागी होणार असून राज्याचा निवड चाचणी संघ निश्चित करण्यात राज्य निवड चाचणीचे आयोजन ऑगस्टच्या तिसऱ्या आठवड्यात श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे या ठिकाणी करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय निवड चाचणीसाठी थेट विभागीय निवड चाचणीचे आयोजन दि. 14 ऑगस्ट 2025 पूर्वी करुन प्रत्येक विभागातून उत्कृष्ट 5 मुला-मुलींची निवड करण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने जिल्हास्तरीय निवड चाचणी दि.11 ऑगस्ट रोजी सकाळी 9 वाजता जिल्हा क्रीडा संकुल, जांभरुन रोड बुलढाणा येथे घेण्यात येणार आहे. चाचणीस येतांना खेळाडूंनी जन्मतारखेचा दाखला, आधारकार्ड, जनरल रजिस्टरची सत्यप्रत किंवा निर्गम उतारा या कागदपत्रांसह उपस्थित रहावे, असे जिल्हा क्रीडा अधिकारी बि.एस. महानकर यांनी कळविले आहे.

## पान एक वरून

**दिल्लीतील निजामुद्दीन परिसरात बॉलिवूड अभिनेत्री हुमा कुरेशीच्या चुलत भावाची हत्या करण्यात आली. ही घटना गुरुवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास जंगपुरा भागोल लेनमध्ये घडली. पोलिसांनी सांगितले की, हुमाचा भाऊ आसिफ कुरेशी याचे मुख्य प्रवेशद्वारासमोर स्कूटर पार्क करण्यावरून दोन शेजाऱ्यांशी भांडण झाले होते. वादानंतर आरोपीने आसिफवर धारदार शस्त्राने हल्ला केला. आसिफला गंभीर अवस्थेत जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.**

# निवडणूक आयोगाचा 'तो' निर्णय तुघलकी- जयश्रीताई शेळके

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर न करण्याचा निर्णय शंकेला वाव देणारा

बातमी जगत | प्रतिनिधी



**बुलढाणा :** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर करण्यात येणार नसल्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय तुघलकी आणि मनमानी असल्याची प्रतिक्रिया शिवसेना उबाठा प्रवक्ता जयश्रीताई शेळके यांनी व्यक्त केली आहे.

राज्यात दिवाळीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकी होतील. अशात वोटिंग ईव्हीएम मशीनबाबत संभ्रमावस्था असल्यावरही राज्य निवडणूक आयोगाने ईव्हीएमचा वापर केला जाईल, परंतू व्हीव्हीपॅटचा वापर केला जाणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीत संभ्रमावस्था शंकेला वाव मिळत असून, हा तुघलकी व मनमानी पध्दतीचा निर्णय आहे. गेल्या काही वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील जिल्हा परिषद, पंचायत समित्या, नगरपालिका आणि महानगरपालिका या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या दिवाळीनंतर होणार असल्याची माहिती समोर आली आहे. ऑक्टोबर महिन्या च्या अखेरीस या निवडणुकांसाठीची प्रक्रिया सुरू होईल. या निवडणुकांमध्ये ईव्हीएमचा वापर करण्यात येणार आहे. मात्र लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांप्रमाणे या निवडणुकीत व्हीव्हीपॅटचा वापर केला जाणार नाही, अशी माहिती निवडणूक आयोगाने दिली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या तयारीचा आढावा घेण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी नाशिकसह उत्तर महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीनंतर निवडणूक आयुक्तांनी पत्रकार परिषद घेत निवडणूकपूर्व तयारीची माहिती दिली. त्यावेळी राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त दिनेश वाघमारे यांनी स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांमध्ये केवळ ईव्हीएमचा वापर केला जाणार आल्याचे स्पष्ट केले.

# विद्यार्थ्यांनी घेतला लोकशाहीचा प्रत्यक्ष अनुभव; निकालानंतर विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाची लाट

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ राजेश पंडित







**देऊळगाव राजा :** राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल, देऊळगाव राजा येथे विद्यार्थ्यांच्या विद्यार्थी परिषद 2025-26 साठी निवडणूक पार पडली. या निवडणुकीद्वारे विद्यार्थ्यांनी मतदानाचा हक्क बजावत लोकशाही प्रक्रिया प्रत्यक्ष अनुभवली. ही संपूर्ण निवडणूक शालेय पातळीवर अत्यंत शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आली. लोकशाही मूल्यांची शिकवण राजलक्ष्मी इंटरनॅशनल स्कूल ही तालुक्यातील एकमेव CBSE संलग्नित संस्था असून, येथे विविध विद्यार्थी प्रतिनिधींची निवड थेट मतदानाद्वारे करण्यात आली. हेड बॉय, हेड गर्ल, डेप्युटी हेड, कल्चरल व स्पोर्ट्स कॅप्टन्स, तसेच हाऊस कॅप्टन्स व उपकॅप्टन्स या पदांसाठी विद्यार्थी उमेदवारांनी फॉर्म भरले आणि प्रचार केला. शेवटच्या तासिकेमध्ये विद्यार्थ्यांना प्रचारासाठी वेळ देण्यात आला. निवडणुकीपूर्वी सर्व उमेदवारांना व मतदारांना मतदान प्रक्रिया, नियम, आचारसंहिता यांची माहिती देण्यात आली. मतदारांच्या बोटाला शाई लावून प्रत्यक्ष मतदानाची पद्धत अंगीकारण्यात आली होती. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून शिक्षकांनी जबाबदारी सांभाळली. उत्साहात निकाल जाहीर मतमोजणी प्रक्रियेनंतर निकाल शाळा आवारात जाहीर करण्यात आला. निकालावेळी विद्यार्थ्यांमध्ये मोठी उत्सुकता होती. विजयी उमेदवारांचे टाळ्यांच्या गजरात स्वागत करण्यात आले. निवडून आलेल्या विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. निवडून आलेली विद्यार्थी परिषद 2025-26 हेड बॉय: वैभव जायभाय हेड गर्ल: मैथिली तायडे कल्चरल कॅप्टन: गायत्री गरड, तन्मय काकड स्पोर्ट कॅप्टन (मुले): कार्तिक वायाळ स्पोर्ट कॅप्टन (मुली): श्रुती सानप हाऊस कॅप्टन निवडी येलो हाऊस: कॅप्टन – आर्यन सरकटे | उपकॅप्टन – दिव्या चव्हाण रेड हाऊस: कॅप्टन – राज भोसले | उपकॅप्टन – जीविका मुंडे ब्लू हाऊस: उपकॅप्टन – कोमल गरड (कॅप्टनचे नाव नमूद नाही) ग्रीन हाऊस: कॅप्टन – सौरभ बनकर | व्हाईस कॅप्टन – खुशी नागरे मान्यवरांची उपस्थिती आणि सहकार्य नवीन विद्यार्थी परिषदेच्या निवडीप्रसंगी संस्थेच्या अध्यक्षा डॉ. मीनल शेळके, सचिव डॉ. रामप्रसाद शेळके, CEO सुजित गुप्ता, प्राचार्या डॉ. प्रियांका देशमुख, व्हॉइस प्रिन्सिपल फैजल उस्मानी, प्री-प्रायमरी प्रिन्सिपल प्रतीक्षा इंगळे, स्पोर्ट्स टीचर वसीम सिद्दिकी, म्युझिक टीचर कांबळे सर यांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनिता टेकाळे आणि मिताली मॅडम यांनी केले, तर निलेश गवळी व बाळासाहेब गोजरे यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली. शिक्षकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचेही मोलाचे सहकार्य लाभले शाळेचा एक आगळा-वेगळा उपक्रम या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्यांची जाणीव झाली, नेतृत्वगुण विकसित झाले, तसेच जबाबदारीची जाणही निर्माण झाली. शाळेच्या या आगळ्या-वेगळ्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# मयत कर्मचाऱ्याच्या कुटुंबियास राजर्षी शाहू मल्टिस्टेटची ५० हजारांची मदत






बातमी जगत | प्रतिनिधी
✦ कैलास राऊत

**बुलढाणा :** हृदयविकाराने निधन झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबियास राजर्षी शाहू मल्टीस्टेटच्यावतीने ५० हजार रुपयांची मदत देण्यात आली.

मेहकर तालुक्यातील आरेगाव येथील गजानन नारायण वायाळ हे संस्थेच्या सिल्लोड शाखेत कार्यरत होते. काही दिवसांपूर्वी त्यांचे हृदयविकाराने निधन झाले. घरातील कर्ता व्यक्ती अचानक काळाने हिरावल्याने पत्नी, मुलगी, वृद्ध आई-वडीलांवर दुःखाचा डोंगर कोसळला. संस्थापक अध्यक्ष संदीपदादा शेळके, संस्थाध्यक्षा मालतीताई शेळके यांनी शोकाकुल कुटुंबाचे सांत्वन केले. संस्थेच्यावतीने विभागीय व्यवस्थापक गोविंद येवले, शाखा व्यवस्थापक अक्षय बोडखे यांनी मयत कर्मचारी यांचे वडील नारायण वायाळ, आई कांताबाई वायाळ यांना ५० हजारांची मदत सुपूर्द केली.

# वर्तमानात पत्रकारांनी आपली भूमिका जोरकसपणे मांडावी - डॉ.शांतनूभाई

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ कैलास राऊत





**मेहकर :** पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षा धारधार मानल्या जाते. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते. पत्रकारांनी सत्तेच्या विरोधात लिखान करणे गरजेचे आहे. कारण हे लिखाण सत्तेच्या विरोधात नसून सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहीणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी लक्षात येणार नाही. त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे. त्यामुळेच वर्तमानात पत्रकारांनी जोरकसपणे लिखाण करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन प्रजापती ब्रह्मकुमारी ईश्वरनीय विश्वविद्यालय मेहकर यांच्या वतीने आयोजित केलेल्या मीडिया चर्चासत्राच्या कार्यक्रम प्रसंगी डॉ.शांतनुभाई राष्ट्रीय संयोजक, मीडिया विंग, राजयोग एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन ब्रह्मकुमारीज यांनी केले. चर्चासत्राच्या सुरुवातीला सर्पमित्र वनिता बोराडे व डी. भास्कर यांनी डॉक्टर शांतनू भाई यांचे स्वागत केले त्याचबरोबर बालकलाकार नंदनी आणि शिवकन्या यांनी स्वागत सादर करून. कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. चर्चासत्राच्या कार्यक्रमात तालुक्यातील अनेक पत्रकारांना आमंत्रित करण्यात आले होते. परंतु पत्रकारांची अनुपस्थिती कार्यक्रमात जाणवली. या कार्यक्रमाला ओम शांती सांप्रदायाचे साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलीप ठाकरे, जगन्नाथ वाघमारे यांच्यासह अनेक साधकांनी परिश्रम घेतले. ब्रह्मकुमारी मीरा दीदी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# मानधन न मिळाल्यास काम बंद आंदोलन, ग्रामरोजगार सेवक संघटनेचा इशारा

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ विष्णु आखरे पाटील



**मेहकर :** मेहकर तालुक्यातील ग्रामरोजगार सहाय्यकांना गेल्या काही महिन्यापासून मानधन मिळाले नसल्यामुळे त्यांच्या परिवारावर उपासमारीची वेळ आली आहे. ३ आक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार दरमहा ८ हजार रुपये व इतर २ हजार रुपये मानधन देण्यात यावे अशी मागणी ग्राम रोजगार सहायक संघटनेच्या वतीने ७ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता गटविकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे १५ ऑगस्ट पर्यंत मानधन न मिळाल्यास १८ ऑगस्ट पासून बेमुदत काम बंद आंदोलन करण्यात येईल असा इशारा सुद्धा देण्यात आला. यावेळी ग्राम रोजगार सहायक संघटनेचे तालुका अध्यक्ष श्रीमंत देशमुख, तालुका उपाध्यक्ष प्रवीण ठोकळ, तालुका सचिव संजय मोरे, भगवान अवसरमोल, संतोष पागोरे, अशोक ठाकरे, बिबीशन राठोड ,मोहम्मद जाकीर हुसेन, विलास गवई, बाबुराव बाजड, अंबादास देशमुख, शिवानंद राऊत ,विठ्ठल लढाड, लक्ष्मण ताजणे ,संजय काळे श्रीकिसन तांगडे, मधुकर असाबे सह ग्रामरोजगार सहाय्यक उपस्थित होते.

# मुख्याध्यापकाचा बनावट कागदपत्रांचा घोटाळा उघड... पण शिक्षण विभाग झोपेत!

बातमी जगत | प्रतिनिधी



**सिंदखेडराजा :** शिक्षण विभागातील गलथान कारभाराचा पुन्हा एकदा पर्दाफाश झाला आहे! दुसरबीड येथील सत्यजित अर्बन क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटीमध्ये खोटे कागदपत्र सादर करून तब्बल ५ लाख रुपयांचे कर्ज उचलणाऱ्या जि.प. शाळेतील उच्च श्रेणी मुख्याध्यापक दामोदर माणिकराव बुरकुल याने शिक्षण क्षेत्राची नाचक्की केली आहे.

या प्रकरणात फसवणुकीचा गुन्हा नोंद झाला, आरोपीस अटक झाली, पोलिस तपासात बनावट हमीपत्र, बनावट सह्या आणि शिक्क्यांचा वापर सिद्ध झाला, तरीसुद्धा शिक्षण विभाग पूर्णतः गप्प... कारवाई शून्य!सन 2020 मध्ये कर्ज घेतलं, 2023 मध्ये गुन्हा दाखल, 4 ऑगस्ट 2025 रोजी अटक, 6 ऑगस्ट रोजी जामीन मंजूर, पण... 2025 मध्येही शिक्षण विभाग जागा झाला नाही! विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक असलेल्या मुख्याध्यापक पदावर बसून बुरकुल यांनी बनावट कागदपत्र सादर करत केलेली ही फसवणूक केवळ पतसंस्थेची नव्हे, तर शिक्षण व्यवस्थेचीच फसवणूक आहे! याशिवाय, देऊळगाव राजा पोलिस ठाण्यातही याच आरोपीवर फसवणुकीचा आणखी एक गुन्हा नोंद आहे, अशी माहिती पोलिस सूत्रांकडून मिळते. शिक्षण विभागाचे जबाबदार अधिकारी गप्प का...? यासारख्या गंभीर प्रकारावर शिस्तभंग, निलंबन, चौकशी वा कारवाईचे आदेश देण्याऐवजी – विभागात खाजगीत कुजबुज, दबक्या आवाजात चर्चा, आणि संशयास्पद शांतता आहे! कोण अधिकारी पाठीशी घालतंय?शिस्तमंडळ अजूनही झोपेत आहे का?मुख्याध्यापक पदाची नैतिक जबाबदारी यांना मान्यच नाही का? इतक्या मोठ्या गुन्ह्यावरदेखील शिक्षण विभागाचे मौन म्हणजे संवेदनशून्यता की संगनमत? असा प्रश्न निर्माण झाला आहे. जनतेचा सवाल – गुन्हेगाराला पाठीशी घालणं थांबवा! शिक्षण क्षेत्र पवित्र ठेवा, भ्रष्टाचार करणाऱ्यांना शिक्षितांचा बुरखा नको! ही फक्त बातमी नाही, ही शैक्षणिक व्यवस्थेतील नासधूस आणि व्यवस्थेतील मूक सहमतीची गोष्ट आहे.

# राखी खरेदीसाठी बहिणींची बाजारात लगबग

## रक्षाबंधनानिमित्त रंगीबेरंगी राख्या बाजारात दाखल; खरेदीस वाढता प्रतिसाद

बातमी जगत | प्रतिनिधी
✦ इमरान सैय्यद



**मालेगांव :** भाऊ-बहिणीच्या पवित्र नात्याचे प्रतीक असलेल्या राखी पौर्णिमा सणाला अवघे चाr शिल्लक राहिले आहेत. त्यामुळे आकर्षक आणि रंगीबेरंगी राख्यांनी मालेगांव शहरातील बाजारपेठ सजली आहे. पारंपरिक राख्या बरोबरच आधुनिक राख्या महिलांचे लक्ष वेधून घेत आहेत. राख्यांच्या खरेदीसाठी मंगळवारी दि 5 रोजी बाजारात उत्साह पहायला मिळाला आहे.

भाऊ, बहिणीचे नाते अधिक घट्ट करणारा सण म्हणून राखी पौर्णिमकडे पाहिले जाते. यंदा शनिवारी दि. ९ रोजी राखी पौर्णिमा सण साजरा होणार आहे. यानिमित्ताने बाजारपेठेत वेगवेगळ्या प्रकारच्या राख्या दाखल झाल्या आहेत. मालेगांव शहराच्या बाजार पेठेत राख्यांची दालनेही सुरू झाली आहे. येथील रंगीबेरंगी राख्या मालेगाव तालुका वाशियांचे लक्ष वेधत आहेत. राख्यांचे आठ शेकडो प्रकार बाजारात आल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. अनेक जण टपाल कार्यालयाच्या माध्यमातून तर काही जण कुरिअरच्या माध्यमातून आपल्या भावाला राख्या पाठवत असतात. त्यामुळे आत्तापासूनच बाजारपेठेत राख्यांच्या खरेदीची लगबग सुरू झालेली पाहायला मिळत आहे. महिलांमधून स्टोनच्या राख्यांना चांगली मागणी आहे. अलीकडे कपल राखीलाही प्रतिसाद वाढत आहे. यात पुरुषा बरोबरच महिलेसाठी राखी असते. ती भावाबरोबरच भावजयीला बांधली जाते. या राख्याही महिलांमधून आवर्जून मागितल्या जात आहेत.

### दहा - पंधरा रुपयांपासून हजार रुपयापर्यंत दर

**राखी विक्रेतेच्या माहितीनुसार बाजारात जरी राखी, दोरी राखी, स्टोन राखी, तनिष्क राखी, कपल राखी असे वेगवेगळे राख्यांचे प्रकार उपलब्ध आहेत. याशिवाय, लहान मुलांसाठी लाइटिंगची राखी व इतर फॅन्सी राख्या बाजारात आलेल्या आहेत. या राख्यांना महिलांचा चांगला प्रतिसाद आहे. अगदी वीस रुपये डझनापासून ते हजाम रुपये डझनापर्यंत राख्या मिळत आहेत.**

घटना -घडामोडी



## जिल्ह्यात जनावरांमध्ये लम्पी चर्मरोगाचा प्रादुर्भाव; नियंत्रित क्षेत्रे घोषित, मनाई आदेश लागू

**बातमी जगत | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** जिल्ह्यातील देऊळगाव, मलकापुर, सिंदखेड राजा, खामगाव व चिखली तालुक्याच्या गावांमधील जनावरांत लम्पी त्वचाआजाराचा प्रादुर्भाव झाल्याचा अहवाल पुणे येथील पशुसंवर्धन रोग व अन्वेषण सहआयुक्त कार्यालयाने दिला आहे. त्यानुसार या तालुक्यातील गावे नियंत्रित क्षेत्रे म्हणून घोषित करण्यात आली असून, या क्षेत्रातील गुरांचे बाजार, वाहतूक व इतर बाबींसंदर्भात मनाई आदेश जिल्हा दंडाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केला आहे. बुलढाणा जिल्ह्यामधील देऊळगाव राजा तालुक्यातील खल्याळगव्हाण सिंगव, जहागीर, पांगरी, अंढेरा, मलकापूर तालुक्यातील मलकापूर शहर, सिंदखेड राजा तालुक्यातील दरेगाव, साखर खेर्डा, उमनगाव, पांगरी काटे, खामगाव तालुक्यातील शीर्ला नेमाने तसेच चिखली येथील केळवद येथील जनावरांत लम्पी या त्वचा आजाराचा प्रादुर्भाव झाल्याचा अहवाल प्रशासनाला प्राप्त झाला. त्यानुसार संसर्ग केंद्रापासून १० किमी बाधित क्षेत्र व निगराणी क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. नियंत्रित क्षेत्रात प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. गुरे, म्हशी प्रजातीचे प्राणी अन्यत्र किंवा नियंत्रित क्षेत्राबाहेर नेण्या-आणण्यास मनाई करण्यात आली आहे. गोजातीय प्रजातीचे जिवंत अथवा मृत प्राणी कोणत्याही बाधित झालेल्या प्राण्याच्या संपर्कात आलेली वैरण, साहित्य, कातडी, प्राण्यापासूनचे अन्य उत्पादन नियंत्रित क्षेत्रातून बाहेर नेण्यास मनाई घालण्यात आली आहे. नियंत्रित क्षेत्रात गुरांचे बाजार, शर्यती, जत्रा, प्रदर्शन यांना मनाई आहे. परिसरात किटक निर्मूलनासाठी स्वच्छता, फवारणीचे आदेश स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात आले आहेत. बाधित जनावर मृत झाल्यास पशुवैद्यकीय अधिका-यांच्या मार्गदर्शनानुसार शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी. निरोगी जनावरांना बाधा होऊ नये म्हणून ती वेगळी ठेवावीत. पशुंना आवश्यकतेनुसार प्रतिजैविके द्यावीत. बाधित क्षेत्राच्या ५ किमी अंतरातील गो व महिषवर्गीय पशुंना गॉट पॉक्स लस द्यावी, आदी आदेश देण्यात आले आहेत. अधिक माहितीसाठी संबंधित पशुवैद्यकीय अधिकारी, ग्रामपंचायत, किंवा जिल्हा पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा.

# जालना पं. स. गटविकास अधिकाऱ्याविरुद्ध भ्रष्टाचाराच्या गंभीर तक्रारी

### भाजपा किसान मोर्चा चे जिल्हाअध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांची विभागीय आयुक्ताकडे चौकशीची मागणी

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**जालना :** दि. ०७ ऑगस्ट जालना कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि भाजपा किसान मोर्चाचे जालना जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांनी जालना पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप पवार यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार आणि गैरव्यवहाराच्या गंभीर तक्रारींबाबत विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे सखोल चौकशी आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे. या तक्रारींमुळे शासकीय योजनांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, ग्रामीण भागातील नागरिकांचे आर्थिक आणि सामाजिक नुकसान होत आहे. ज्ञानेश्वरमाऊली शेजूळ यांनी आपल्या पत्रात नमूद केले की, रोजगार हमी योजने अंतर्गत स्मशानभूमी शेड, शाळेच्या कंपाउंड वॉल, गटार नाल्या, पानंद रस्ते आणि विहिरींच्या कामांसाठी मंजूर निधीपैकी १० टक्के रक्कम पवार कमिशन म्हणून घेतात. पानंद रस्त्याच्या प्रशासकीय मान्यतेसाठी प्रत्येक प्रस्तावाला ५०,००० रुपये आणि विहिरीच्या मंजुरीसाठी प्रति लाभार्थी ३०,००० रुपये लाच स्वरूपात आकारली जात असल्याचा जालना तालुक्यातील शेतकऱ्यांचा आरोप आहे. याशिवाय, पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर आवास योजना, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना आणि वसंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनांच्या लाभार्थ्यांकडून प्रति लाभार्थी १०,००० रुपये लाच घेतली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. यामुळे गरीब आणि गरजू लाभार्थ्यांचे शोषण होत असून, शासकीय योजनांचा मूळ उद्देश डावलला जात आहे. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी सांगितले की, जालना तालुक्यातील अनेक लाभार्थी आणि गावकऱ्यांनी पवार यांच्या भ्रष्टाचाराबाबत लेखी आणि तोंडी तक्रारी केल्या आहेत. या तक्रारींमधून पवार यांनी पंचायत समितीच्या अधिकारांचा गैरवापर करून संगनमताने भ्रष्टाचार केल्याचे स्पष्ट होते. यामुळे ग्रामीण विकासकामांवर विपरीत परिणाम झाला असून, शासकीय निधीचा दुरुपयोग झाला आहे. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी विभागीय आयुक्तांना या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन त्वरित कारवाई करण्याची विनंती केली आहे. याबाबतची प्रतिलिपी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, जिल्हाधिकारी जालना आणि मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना यांना पाठवण्यात आली आहे. याप्रकरणी रोजगार हमी योजना आणि आवास योजनांच्या निधी वितरण, मंजुरी प्रक्रिया आणि अंमलबजावणीची खातेनिहाय चौकशी, दोषी आढळल्यास पवार यांचे तात्काळ निलंबन आणि भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत कायदेशीर कारवाई, तसेच शोषित लाभार्थ्यांना न्याय आणि नुकसान भरपाई मिळावी, अशी मागणी ज्ञानेश्वर माऊली शेजूळ यांनी केली आहे. तसेच, जालना पंचायत समितीच्या कामकाजात पारदर्शकता आणि जबाबदारी सुनिश्चित करणारी यंत्रणा लागू करण्याची विनंतीही त्यांनी केली आहे.

## आ. डॉ. संजय कुटे यांच्या मातोश्रींचे निधन



**बातमी जगत | प्रतिनिधी**

**बुलढाणा :** माजी मंत्री तथा जळगाव जामोद विधानसभा मतदारसंघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांच्या मातोश्री स्व. उर्मिला श्रीराम कुटे (वय 81) यांचे निधन झाल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज जळगाव जामोद येथील निवासस्थानी भेट देत स्व. उर्मिला कुटे यांना आदरांजली अर्पण केली. यावेळी मुख्यमंत्र्यांनी डॉ.कुटे यांच्यासह कुटुंबियांचे सांत्वन केले.

यावेळी जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री आकाश फुंडकर,आमदार डॉ. संजय कुटे व त्यांचे कुटुंबिय, विभागीय उपायुक्त अजय लहाने, अमरावती विभागाचे विशेष पोलीस महानिरिक्षक रामनाथ पोकले, उपजिल्हाधिकारी सदाशीव शेलार, प्र.पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, अपर पोलीस अधीक्षक अमोल गायकवाड, उप विभागीय अधिकारी शैलेश काळे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील आदी उपस्थित होते.

## पशुवैद्यकीय दवाखान्याच्या जुन्याच भिंतीला रंगरंगोटी करून लाखोचे बिले काढणारा आका कोण ?

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**सिंदखेडराजा :** शासन जनावरांच्या हिताकरिता लाखो रुपये खर्च करते ग्रामीण भागात जनावरांना योग्य उपचार मिळावा म्हणून पशुवैद्यकीय दवाखान्यांची उभारणी केली, मात्र काही पशुवैद्यकीय दवाखाने नव्याने बांधण्याकरता शासनाने लाखो रुपयांचा निधी वाटप केला आहे, मात्र कुंपणच शेत खाण्याचा प्रकार करत असेल तर याला काही अर्थ राहत नाही, गल्ली ते दिल्ली पर्यंत कनिष्ठापासून तर वरिष्ठापर्यंत सर्वजण निकृष्ट दर्जाच्या कामात जर सहभागी असतील तर नक्कीच येणारा काळ हा त्यांना माफ करू शकणार नाही, सिनखेडराजा तालुक्यातील मलकापूर पांगरा व दुसरबीड येथील पशुवैद्यकीय दवाखाना बांधण्याकरता सार्वजनिक बांधकाम उपविभाग अंतर्गत दोन्हीही पशुवैद्यकीय दवाखान्यांना प्रत्येकी 40 लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता, मात्र संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनी मोठी शक्कल लढवली, पशुवैद्यकीय दवाखान्याला अगोदरच असलेल्या भिंतीलाच रंगरंगोटी केली व भिंती नव्या केल्या कोणालाही वाटेल की या भिंती नव्याने बांधलेले आहेत, मात्र तसं न करता जुन्याच भिंतीला रंगरंगोटी करून लाख रुपयाची बिले वरिष्ठापासून तर कनिष्ठ पर्यंत सर्वच अधिकाऱ्यांनी मिळून काढली आहे, त्यामुळे या प्रकाराचे मांगे कोणता मोठा अधिकारी का म्हणून जुन्याच कामावरून बिले काढत आहे याच्या शोध घेणे गरजेचे आहे,

तर एका सामाजिक कार्यकर्त्याने दोन्हीही दवाखान्याची लवकर चौकशी लागेल अशी माहिती नाव न सांगण्याच्या अटीवर दिली आहे, त्यामुळे लवकरच आका कोण या प्रश्नाचे उत्तर मिळेल .

## थापड पडली महागात; हर्षवर्धन जाधव यांना कारावास

### कन्नडचे माजी आ. हर्षवर्धन जाधव यांनी नागपुरात पोलिस निरीक्षकाला मारली होती थापड

**बातमी जगत | प्रतिनिधी**



**संभाजीनगर :** उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या सुरक्षा ताफ्यामधील पोलिस निरीक्षकाला थापड मारल्यामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नडचे माजी आमदार हर्षवर्धन रायभान जाधव यांना बुधवारी नागपूर सत्र न्यायालयाने एक वर्ष कारावासाची शिक्षा सुनावली. तसेच, एकूण २० हजार रुपयांचा दंड ठोठावला. न्यायाधीश आर. जे. राय यांनी हा निर्णय दिला.

हो घटना १७ डिसेंबर २०१४ रोजी वर्धा रोडवरील हॉटेल प्राईड येथे घडली. त्या दिवशी सायंकाळी ६ च्या सुमारास हॉटेलमध्ये उद्धव ठाकरे यांची बैठक सुरू होती. आवश्यक नेत्यांनाच बैठकीच्या कक्षात प्रवेश दिला जात होता. हर्षवर्धन जाधव यांना प्रवेश देण्यात आला नाही. त्यामुळे ते जोरजोरात ओरडून 'माझी आत येण्याची औकात नाही का' असे म्हणाले. परिणामी, सुरक्षा ताफ्यातील पोलिस अधिकारी व कर्मचारी सतर्क होऊन परिस्थिती सांभाळायला लागले. दरम्यान, हर्षवर्धन जाधव चिडले. त्यांनी स्पेशल प्रोटेक्शन युनिटचे पोलिस निरीक्षक पराग जाधव यांच्या डाव्या गालावर थापड मारली आणि तेथून धावपळ करीत निघून गेले. त्यानंतर सोनेगाव पोलिसांनी पराग जाधव यांच्या तक्रारीवरून हर्षवर्धन जाधव यांच्याविरुद्ध एफआयआर नोंदविला व सत्र न्यायालयात खटला दाखल केला. न्यायालयात सरकारच्यावतीने ॲड. चारुशीला पौनिकर यांनी बाजू मांडली. त्यांनी विविध ठोस पुराव्यांच्या आधारावर जाधव यांच्याविरुद्धचे गुन्हे सिद्ध केले.

**...तर तीन महिने अतिरिक्त कारावास**

**भादंवि कलम ३५३ (सरकारी कामात अडथळा आणणे) अंतर्गत एक वर्ष कारावास व दहा हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त कारावास. भादंवि कलम ३३२ (सरकारी कर्मचाऱ्याला दुखापत करणे) अंतर्गत एक वर्ष कारावास व दहा हजार रुपये दंड आणि दंड न भरल्यास तीन महिने अतिरिक्त कारावास.**

## मानव सुरक्षा सेवा ट्रस्ट चा दुसरा वर्धापन दिन शेगांव येथे उत्साहात

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ गणेश ताकतोडे



**मेहकर :** ५ ऑगस्ट रोजी शेगाव येथे मानव सुरक्षा सेवा ट्रस्ट या सामाजिक संघटनेचा दुसरा वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात २०२४ या मागील वर्षभरात मानव हिताचे उल्लेखनीय सामाजिक कार्य केल्याबद्दल पदाधिकारी यांचा सन्मान करण्यात आला. तसेच नवनियुक्त पदाधिकारी यांना नियुक्तीपत्र व आयकार्ड वितरण करण्यात आले. कार्यक्रमाला संपूर्ण महाराष्ट्र राज्यातून पदाधिकारी पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून. संस्थापक अध्यक्ष गजानन इंगळे, संगीताताई साबणकर,राष्ट्रीय महिला प्रमुख रंजनाताई चव्हाण,राष्ट्रीय प्रमुख राजेशकुमार ठाकूर, राष्ट्रीय सचिव अजय मुळतकर, राष्ट्रीय कार्याध्यक्ष गजानन इंगळे, कार्याध्यक्ष प्रदीप पारस्कार, संपर्क प्रमुख आरिफ खान, सचिव रामेश्वर कापडे,मीडिया प्रमुख समाधान पदमने, महिला कार्याध्यक्ष वंदनाताई म्हैस,विदर्भ प्रमुख ज्ञानेश्वर खवले,कार्याध्यक्ष किशोर भूतकर, सचिव गणेश मोरे,सहसचिव दत्तात्रय वाघमारे,बुलढाणा जिल्हा अध्यक्ष गुणवंत खवले,सामाजिक कार्यकर्ते माणिक कानडे,निरीक्षक फिरदोस खान,अकोला जिल्हा अध्यक्ष भास्कर जाधव अकोला ग्रामीण जिल्हा अध्यक्ष कैलास पोहनकर, जळगाव तालुका प्रमुख योगेश वाघ, शेगाव तालुका अध्यक्ष कैलास कावनपुरे व इतर पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी गजानन इंगळे यांनी मार्गदर्शक केले .व येणाऱ्या काळात मानव हिताचे वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे यावेळी ते बोलतांना म्हणाले. या बहारदार सोहळ्याकरिता, शिर्डी,अमरावती.अकोला, बुलढाणा तसेच पुरुष,महिला पदाधिकारी यांची सुद्धा उपस्थिती दर्शविली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रंजनाताई चव्हाण, प्रदीपभाऊ पारस्कार, समाधान पदमने यांनी केले .कार्यक्रमाचे आयोजन प्रदीप पारस्कार व आरिफ खान यांनी केले होते.




## भारत मातेची १७ वर्षे सेवा बजावून भारतीय सैनिक कमलाकर भऊड सेवानिवृत्त

**बातमी जगत | प्रतिनिधी**

✦ किरण बांधणकर



**पेण :** भारतीय सैन्यात १७ वर्षे प्रामाणिक सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले हवालदार कमलाकर बळीराम भऊड हे आपल्या स्वगृही परतल्यानंतर आंबेघर ग्रामस्थांच्या वतीने पेण ते आंबेघर अशी भव्य दिव्य मिरवणूक काढून त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.

सन २००९ मध्ये पांडुरंग जेधे यांनी भारतीय सैन्यात जाण्यासाठी मार्ग दाखविला आणि स्वतःच्या कर्तुत्वाने कमलाकर भऊड हे सैन्यात भरती झाले.भारत मातेच्या रक्षणासाठी मणिपूर, मध्यप्रदेश, चाणीगौंड कारगिल, बंदीपुरा श्रीनगर, बिकानेर राजस्थान, जम्मू आणि काश्मीर, गुजरात या ठिकाणी सेवा बजावून १६ मराठा एलआय बटालियन आणि मराठा रेजिमेंट मधून सेवा पूर्ण केली तसेच उरी सेक्टर ऑपरेशन सिंदूर मध्ये देखील महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे.कमलाकर भऊड यांचे निफाड हे जन्मगाव आहे पण आता ते आंबेघर येथे स्थायिक झाले असून त्यांच्या कामगिरीचे संपूर्ण पेण तालुक्यातून कौतुक केले जात आहे. त्यांची भव्य मिरवणूक पेण शहरातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाला पुष्पहार घालून भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर स्मारक, पेण चावडी नाका त्यानंतर गणपती वाडी जवळ धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक पर्यंत बाईक रॅली झाली.नंतर तेथून रथामध्ये बसून त्यांना आंबेघर गावात सन्मानपूर्वक आणले गेले.यावेळी भारत माता की जय, वंदे मातरम्,जय जवान जय किसान अशा जोरदार घोषणा देत देशभक्तीपर गीतांनी वातावरण गजबजून गेले होते.या मिरवणुकीत गावातील ज्येष्ठ ग्रामस्थ, महिला, तरुण,लहान मुले हातात तिरंगा घेऊन सहभागी झाले होते. त्यानंतर त्यांच्या निवासस्थानी सेवापूर्ती सत्कार समारंभ कार्यक्रम झाला. या कार्यक्रमाला माजी नायब सुभेदार समीर आठवले, भारतीय सैनिक मंदार भोईर, महाराष्ट्र पोलीस उर्मिला भोईर,मावळा प्रतिष्ठान अध्यक्ष मंगेश दळवी, शिरीष मानकवळे, गजाजन मोरे,माजी सैनिक सचिन पाटील,माजी सैनिक गणेश म्हात्रे, माजी सैनिक योगेश पाटील, माजी सैनिक मंगेश पाटील यावेळी उपस्थित होते.

